Single Unified Portal या प्रणालीमध्ये Geo-tagging करण्यासाठी मोबाईल ॲप विकसन व देखभाल याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :** प्रणाली५६२४/प्र.क्र. ५६(भाग-१)/मातंक
५ वा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
**दिनांक** : १२ ऑगस्ट, २०२५.

**वाचा :**

१) प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि. १८ एप्रिल, २०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
२) या विभागाचे क्र. :- प्रणाली५६२४/प्र.क्र.५६/मातंक, दि. १० मे, २०२४ व ९ ऑक्टोबर, २०२४ चे पत्र.
३) एनआयसी, दिल्ली यांचा दि. ४ जून, २०२४ रोजीचा प्रस्ताव.

**प्रस्तावना :**

या विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, कामकाजात गतिमानता व पारदर्शकता आणणे , विविध योजनांद्वारे करण्यात येणाऱ्या कामाची द्विरूक्ती टाळणे, निधी वितरणाचे संनियंत्रण करणे, कामात एकसुत्रता आणणे तसेच सेवेची गुणवत्ता वाढविणे या दृष्टीने विभागात Single Unified Portal हा माहिती तंत्रज्ञान आधारित प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन ई-प्रशासन धोरण शासन निर्णय क्र.मातंस-२०११/प्र.क्र.१२५/३९ आयटी पॉलिसी दि.२३/०९/२०११ मधील मुद्दा क्र.१४.३ मध्ये "ई प्रशासनाला प्रोत्साहन देण्यासाठी एन.आय.सी. व सिडॅक या संस्थेबरोबर संयुक्तरित्या प्रकल्प करण्याला विशेष प्रोत्साहन देण्यात यावे", असे नमूद आहे. त्यास अनुलक्षून Single Unified Portal करिता ग्राम मानचित्र ह्या प्रणालीवर आधारित मोबाईल ॲप विकसित करण्यासाठी एनआयसी, दिल्ली यांचेकडून दि. १०.०५.२०२४ च्या पत्रान्वये प्रस्ताव मागविण्यात आला होता. त्यानुसार त्यांचेकडून Single Unified Portal या प्रणालीमध्ये Geo-tagging करण्यासाठी मोबाईल ॲप विकसन व देखभाल याकरिता दि. ४.०६.२०२४ रोजी रू.३१,४५,६१४/- (करासह) इतक्या रकमेचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावाला दि.१४/०८/२०२४ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. Single Unified Portal या प्रणालीमध्ये Geo-tagging करण्यासाठी मोबाईल ॲप विकसन व देखभाल यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:**

Single Unified Portal या प्रणालीमध्ये Geo-tagging करण्यासाठी मोबाईल ॲप विकसन व देखभाल याकरिता एनआयसी, दिल्ली या संस्थेला रू. रू.३१,४५,६१४/- (करासह) इतकी रक्कम अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. यासाठीचा खर्च "मागणी क्रमांक एल-४ , ३४५१-सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा-(०१)(०३)- ई गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी १७ संगणक खर्च-(३४५१ २८०८) मागणी क्रमांक एल-४ (योजनांतर्गत) (दत्तमत)" या लेखाशिर्षातंर्गत सन २०२५-२६ मध्ये उपलब्ध झालेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: विअप्र २०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये सुधारित केल्यानुसार वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ सोबतच्या परिशिष्टातील भाग पहिला ,उप विभाग दोन, अनुक्रमांक २७-अ, नियम क्रमांक-७६ अन्वये विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८०७१२४००१०६२० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2025.08.12 15:31:29 +05'30'

**( प्रशांत पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
३. सर्व सह/उप सचिव , ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
४. वरिष्ठ तांत्रिक निदेशक, एनआयसी, दिल्ली.
५. निवड नस्ती (का.माहिती तंत्रज्ञान कक्ष), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.